# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-५९ दिनांक - २६/०२/२०२४

## गांजा हा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी जवळ बाळगणाऱ्या महिलेस गजाआड करण्यात पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

दिनांक २४/०२/२०२४ रोजी पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत गावदेवी मंदीर परिसर धानिवबाग नालासोपारा पुर्व ता.वसई जि. पालघर येथे एक महिला गांजा नावाचा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याबाबत गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहा.पोलीस निरीक्षक/सोपान पाटील, यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली होती.

सदर बातमीच्या अनुषंघाने सहा.पोलीस निरीक्षक सोपान पाटील, यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांना सदरबाबत माहिती दिली. त्यांनी सदर बातमीची सत्यता पडताळणी करुन कायदेशिर कारवाई करण्याबाबत आदेश दिले होते. सदर आदेशान्वये व बातमीच्या अनुशंघाने पोलीस निरीक्षक श्री. कुमारगौरव धादवड, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक/सोपान पाटील, पोलीस उप निरीक्षक तुकाराम भोपळे व पोलीस पथकाने गावदेवी मंदीर धानिवबाग नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर येथे सापळा रचुन सदर ठिकाणी गांजा या अंमली पदार्थाची विक्री करण्याकरीता आलेली महिला जमुना निलेश जाधव, वय ३५ वर्षे, हिस ताब्यात घेऊन तिची महिला पोलीसा मार्फत अंगझडती घेतली असता तिच्या ताब्यात ०३ किलो ८०० ग्रॅम वजनाचा ८३,६००/- रु किंमतीचा कॅनाबीस या वनस्पतीची शेंडे असलेला म्हणजे गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने तिचे विरुध्द पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. २५६/२०२४ एन.डी.पी.एस. ॲक्ट- १९८५ चे कलम ८ (क), २० (ब) ii प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर महिला आरोपीत हिचेबाबत पोलीस ठाण्याचा गुन्हे अभिलेख पडताळला असता तिचे विरुध्द यापुर्वी देखील पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७३७/२०२३ एन.डी.पी.एस. ॲक्ट-१९८५ चे कलम ८(क), २० (ब) प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ - ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक/सोपान पाटील, पोलीस उप निरीक्षक तुकाराम भोपळे, पोहवा. योगेश देशमुख, पो.अं. रवि वानखेडे, राहुल कर्पे, दिलदार शेख, निखिल मंडलिक, अनिल साबळे, सुजय पाटील, महिला पोलीस अंमलदार रुपाली सकट यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.